जिल्हास्तरीय योजनेअंतर्गत खाजगी ARM/MRM रिलींग घटकांनी उत्पादित केलेल्या रेशीम सूतावर अनुदान देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपुर**

जा.क्र.रे/कार्या-8/ जि.वा.यो. / ए.आर.एम./सूत उत्पा.अनु./........./मान्यता / 24-25/ दिनांक -

**ARM/MRM-**................................................

संदर्भ:- 1) शा.नि.क्र.रेशीम/केपुयो/1416/प्र.क्र.94/रेशीम कक्ष, मंत्रालय, मुंबई. दि.21.03.2018.

2) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे पत्र क्र.केपुयो/1416/प्र.क्र.94/ रेशीम कक्ष. दि.30.08.2018.

3) शा.नि.क्र.रेशीम/केपुयो/1416/प्र.क्र.94/रेशीम कक्ष, मंत्रालय, मुंबई. दि.22.01.2020.

4) प्रारेका यांचे पत्र जा. क्र.

5) जिरेका, यांचे पत्र जा.क्र.

-: **आदेश** :-

उपरोक्त विषयान्वये शासन निर्णय संदर्भ क्र.1 नुसार तुती व टसर रेशीम शेतीसाठी खाजगी उदयोजकांना शेतकऱ्यांप्रमाणे तुती व टसर कोषेत्तर प्रक्रियासाठी जिल्हास्तरीय योजनेअंतर्गत ॲटोमॅटीक/ मल्टिऐंड रिलींग मशीनवर बायव्होल्टाईन रेशीम सूत उत्पादनावर प्रति किलो रूपये ........... प्रमाणे अनुदान देणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाचे संदर्भ क्रं.2 च्या पत्रान्वये सदरची योजना राबविणेसाठीच्या निकषांना मान्यता देण्यात आलेली असुन त्यामध्ये सहायक संचालक प्रादेशीक रेशीम कार्यालय यांचेकडुन प्रस्ताव योग्य असले बाबतचे प्रमाणपत्र व शिफारसीसह संचालनालयास प्राप्त प्रस्तावास संचालक रेशीम हे मंजुरी देतील व सदरील रेशीम सूत उत्पादनाचे संबधीत रेशीम विकास अधिकारी यांचेकडे प्रस्ताव तांत्रिक मान्यता देण्यासाठी पाठवतील. रेशीम विकास अधिकारी यांनी तांत्रिक मान्यता दिल्यावर प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करतील व त्यानुसार अनुदानाचे देयके कोषागार कार्यालयातुन आहारीत करणे बाबत कार्यवाही करुन डीबीटी (DBT) द्वारे संबधित रिलर्सना अनुदान वाटप होईल, असे निर्देशीत केलेले आहे.

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाचे संदर्भ क्रं. 3 च्या शा.निर्णयान्वये रेशीम सूत उत्पादन योजना राबविण्यासाठी कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधीत जिल्हयांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

उपसंचालक/सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, .................. यांनी संदर्भ क्र. 4 नुसार ARM घटक ........................................................................... यांचा प्रस्ताव शिफारशीसह पाठविण्यात आला आहे. माहे ................................................ चे प्राप्त प्रस्ताव तपशील खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे

| अ.क्र. | कालावधी | रिलींग केलेले कोष कि.ग्रॅ. | एकूण सूत उत्पादन कि.ग्रॅ. | उत्पादीत सुताचा ग्रेड | सूत उत्पादन अनुदानाची रक्कम रुपये / किलो प्रमाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | | |
| | एकुण | | | | | |

वाचा क्र. 1 , 2 व 3 अन्वये रेशीम सुत उत्पादन अनुदान अंतर्गत ॲटोमॅटीक/ मल्टिऐंड रिलींग युनीट (ARM/MRM) वर उत्पादीत बायव्होल्टाईन रेशीम सूत उत्पादनासाठी प्रति किलो रु.......... /- प्रमाणे ..........कि.ग्रॅ. बायहोल्टाईन सूताकरीता एकूण रक्कम **रू.** ...................... **(अक्षरी रू.** ........................................................ ) इतके अनुदान मंजूर करण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालय, ............... व प्रादेशिक रेशीम कार्यालय,............... यांनी शिफारस केली आहे. त्यांचे प्रमाणपत्र व शिफारशीस अधीन राहुन ........................................................................... यांचे प्रस्तावास शिफारस करण्यात येत आहे व अनुदानाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे.

वाचा क्र. 1 , 2, 3, 4 व 5 अन्वये रेशीम सुत उत्पादन अनुदान अंतर्गत ................................................ यांचे ॲटोमॅटीक/ मल्टिऐंड रिलींग युनीट (ARM/MRM) वर उत्पादीत बायव्होल्टाईन रेशीम सूत उत्पादनासाठी प्रति किलो रु. ........... प्रमाणे .................. कि.ग्रॅ. बायहोल्टाईन सूताकरीता एकूण रक्कम **रू.** ................................ **(अक्षरी रू.** ...................................) इतके अनुदानाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे.

- प्रती-

**संचालक (महाराष्ट्र राज्य)**
**रेशीम संचालनालय, नागपूर**

**प्रत कार्यवाहीसाठी**

1. रेशीम विकास अधिकारी श्रेणी -2,
   जिल्हा रेशीम कार्यालय,............
2. सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, .............
3. रिलर .............

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी -**

मा.जिल्हाधिकारी ,
जिल्हाधिकारी कार्यालय, ...................

# परिशिष्ट-1

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत रेशीम सुत उत्पादन अनुदान देण्याच्या शासनाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती पुर्तता अहवाल

महिना-

खाजगी रिलींग युनिटचे नाव:-

| अ) योजना राबविण्याचे निकष | खाजगी रिलींग घटकांनी केलेली पुर्तता |
|---|---|
| 1. रिलींग युनिट हे महाराष्ट्र राज्यामध्ये कार्यान्वीत असणे बंधनकारक आहे. | |
| 2. रिलिंग केंद्र धारकाचे स्वत:चे/ संचालनालयाने दिलेले अथवा संचालनालयाच्या पुर्व परवानगीने भाडे तत्वावर सुरु केलेले रिलींग युनिट असणे बंधनकारक आहे. | |
| 3. सदर योजना ही महाराष्ट्रात उत्पादीत होणाऱ्या व राज्यातच खरेदी केल्या जाणाऱ्या तसेच राज्यातच प्रक्रीया करुन उत्पादीत होणाऱ्या तुती बायव्होल्टाईन व टसर रेशीम सुत यासाठीच लागु असेल. | |
| 4. संबंधित रिलींग केंद्र धारकांनी MIS प्रणालीवर त्यांच्या रिलींग युनिटची नोंदणी करणे बंधनकारक राहील. (MIS वर नोंदणी घेण्यासाठी प्रपत्राचा तपशिल संचालक (रेशीम) यांनी निश्चित करुन शासनास सादर करावा. | |
| 5. अनुदानासाठी अनुज्ञेय प्रती दिवस तुती (BV) रेशीम सुत/धागा उत्पादन कमाल मर्यादा :<br>**मल्टिएंड/ कॉटेज बेसीन रिलींग मशिन्स**<br>6 बेसीनसाठी सुत उत्पादन - 9.00 किलो<br>10 बेसीनसाठी सुत उत्पादन- 15.00 किलो<br>20 बेसीनसाठी सुत उत्पादन- 15.00 किलो<br>**ऑटोमॅटीक रिलींग मशिन्स**<br>200 एंडसाठी सुत उत्पादन - 56.00 किलो<br>400 एंडसाठी सुत उत्पादन - 112.00 किलो | |
| 6. मल्टिएंड/ कॉटेज बेसीन रिलींग मशिनवर ग्रेडेबल बायव्होल्टाईन सुत या प्रतीचे निकषानुसार सुत उत्पादन तसेच ऑटोमॅटीक रिलींग मशिनवर 2A ग्रेड व त्यापेक्षा जास्त दर्जेदार बायव्होल्टाईन प्रतीचे निकषानुसार सुत उत्पादन घेणे अनिवार्य असेल. | |
| 7. टसर रिलींग कम व्टीस्टींग मशिन (4 एंड) व मोटोराईज्ड रिलींग कम व्टीस्टींग (4 एंड) मशिनवर 150 ग्राम प्रती दिवस इतकी टसर रील्ड सुत/ धागा उत्पादन कमाल मर्यादा राहील. | |

रेशीम विकास अधिकारी श्रेणी-1/2

जिल्हा रेशीम कार्यालय,

# परिशिष्ट-2

जि. वा. यो. अंतर्गत रेशीम सुत उत्पादन अनुदान देण्याच्या शासनाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक सुचना व पुर्तता अहवाल

महिना-

खाजगी रिलींग युनिटचे नाव :-

| आ) योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक सुचना | खाजगी रिलींग घटकांनी केलेली पुर्तता |
|---|---|
| 1. रिलींग केंद्र धारकाला शेतकऱ्याकडुन खरेदी केलेल्या कोषांची नोंद कोष खरेदी रजिस्टरमध्ये ठेवणे बंधनकारक असेल, कोष रजिस्टरचा नमुना ठरवुन देण्याची जबाबदारी संचालक (रेशीम) यांची असेल. | |
| 2. रिलींग केंद्रावर शेतकऱ्यांचे कोष खरेदी केल्यावर कोषांची रक्कम अदा केल्याचे पुरावे सादर करणे बंधनकारक असेल. (उदा. धनादेश, RTGS, चेक इत्यादी माध्यमातुन) रक्कम अदा केलेल्या बँक पासबुक/ बँक स्टेटमेंटची स्वसांक्षाकीत छायाप्रत तसेच कोष खरेदी पावतीवर/ पेमेंट तपशिलात कोष विक्री करणाऱ्या संबंधित शेतकऱ्याचा नामोल्लेख असणे आवश्यक. | |
| 3. रिलींग केंद्र धारकास राज्यातील शासकीय कोष बाजारपेठेतुन खरेदी केलेल्या कोषांची पावती / तसेच वेळोवेळी रेशीम संचालनालयाने कोष बाजारपेठेसाठी परवानगी दिलेल्या ठिकाणाची पावती सादर करणे आवश्यक आहे. | |
| 4. रिलींग केंद्र धारकाने दैनंदिन सुत उत्पादन रजिस्टर अद्ययावत ठेवणे, आवश्यकतेनुसार निरिक्षणास उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल. | |
| 5. रिलींग केंद्र धारकाने रिलींग केंद्रावर काम करणाऱ्या मजुरांचे रजिस्टर अद्ययावत ठेवणे बंधनकारक असेल. | |
| 6. रेशीम सुत उत्पादन झालेल्या कालावधीचे इलेक्ट्रिक बील सादर करणे आवश्यक असेल. | |
| 7. जिल्हा रेशीम कार्यालयाच्या तांत्रिक कर्मचारी/ अधिकारी यांच्यामार्फत रिलींग युनिटची तपासणी विहीत कालावधीत करणे आवश्यक राहील. तपासणीवेळी सुताची प्रतवारी निश्चित करण्याची जबाबदारी अधिकारी/कर्मचारी यांची राहील. तपासणी अहवालाची एक प्रत रेशीम विकास अधिकारी रिलींग केंद्र धारकास उपलब्ध करुन देतील. | |
| 8. केंद्रीय रेशीम मंडळ, बेंगलुरु यांचे मार्फत सुत प्रतवारीबाबत तांत्रिक अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संचालक रेशीम यांची राहील. | |
| 9. जिल्हा रेशीम कार्यालयाने रेशीम सुत उत्पादनाचा पाक्षिक अहवाल प्रादेशिक रेशीम कार्यालय व रेशीम संचालनालय यांना नियमित सादर करणे बंधनकारक असेल. | |

## परिशिष्ट-3

| लावधी/महिना | रिलींग केलेले कोष वजा जाता शिल्लक कोष साठा (Kg) | कोष खरेदी (Kg) | रिलींग केलेले कोष (Kg) | रेशीम सुत उत्पादन (Kg) | महिन्यातील रिलींग कामकाजाचे दिवस | देय सुत अनुदान रक्कम रु. | वीज बील रिडींग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | मागील महिन्यातील अखेरची रिडींग | चालु महिन्यातील अखेरची मिटर रिडींग | वापर केलेली वीज रिडींग |
| | | | | | | | | | |

रेशीम विकास अधिकारी श्रेणी-1/2

जिल्हा रेशीम कार्यालय,